जा.क्र./विप्र-3/राअसुअ.व्या.पि.-कापूस/15-16/266 /2015
कृषि आयुक्तालय, शिवाजीनगर, पुणे.
दिनांक :19/ 06 /2015.

**प्रति**,

१) **विभागीय कृषि सहसंचालक**, अमरावती / नागपूर विभाग

२) **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी**, बुलढाणा, अकोला, अमरावती, वाशिम, यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर

विषय:- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-व्यापारी पिके अंतर्गत सघन कापूस विकास कार्यक्रम **2015-16** राबविणेबाबतच्या अंतरिम मार्गदर्शक सूचना. . .

**संदर्भ** :- 1. केंद्र शासनाचे पत्र क्र. 3-1/2015- सीयु /IV/ दि. 15/04/2015
2. कृषि आयुक्तालयाचे पत्र जा.क्र. कॅश क्रॉप/ कॉटन/15-16/228, दि. 18/05/2015

सन 2013-14 पर्यत तंत्रज्ञान अभियान -II अंतर्गत राबविण्यात येणारा केंद्र पुरस्कृत सघन कापूस विकास कार्यक्रम 12 व्या पंचवार्षिक योजनेत बंद करण्यात आला असून सन 2014-15 पासून राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-व्यापारी पिके या अंतर्गत कापूस विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

केंद्र शासनाने संदर्भ 1 च्या पत्रानव्ये सदर कार्यक्रमांतर्गत सन 2015-16 करीता कापूस पिकासाठी रु. 316 लाखाच्या कार्यक्रम महाराष्ट्र राज्यासाठी तत्वत: निश्चित केला आहे. मागील वर्षी 100 टक्के केंद्र पुरस्कृत असलेला हा कार्यक्रम सन 2015-16 मध्ये केंद्र : राज्य 50 : 50 टक्के यानुसार राबविण्यात येणार आहे. त्यानुसार संदर्भ 2 अन्वये मागील वर्षीच्या देय खर्चासह (कमिटेड एक्स्पेंडीचर) सन 2015-16 मध्ये केंद्र हिस्सा रु. 158.99 लाख आणि राज्य हिस्सा रु. 158 लाख या नुसार एकूण रु. 316.99 लाख रक्कमेचा कार्यक्रम प्रस्तावित करण्यात आला आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-व्यापारी पिके अंतर्गत सघन कापूस विकास कार्यक्रम या योजनेअंतर्गत सन 2015-16 मध्ये रू. 316 लाख रकमेचा जिल्हानिहाय घटकनिहाय अंतरिम आर्थिक /भौतिक कार्यक्रम व मार्गदर्शक सुचना पाठविण्यात येत आहेत. सदर योजनेसाठी केंद्र शासनाकडून रु. 1.58 कोटी व राज्यशासना कडून रु. 1.58 कोटी या प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदर योजनेस राज्य शासनाची प्रशासकीय मंजुरी लवकरच अपेक्षित आहे. त्याप्रमाणे कार्यक्रम राबवण्यासाठी पुर्व तयारी बाबत क्षेत्रीय अधिकारी / कर्मचारी यांना सूचना देण्यात याव्यात. **सदर कार्यक्रम शासनाच्या मंजुरी नंतरच कार्यान्वयीत करावा** परिशिष्ट 1 मध्ये दर्शविल्याप्रमाणे तिमाही अहवाल तिमाही संपताच तर परिशिष्ट 2 मध्ये दर्शविल्याप्रमाणे मासिक अहवाल दर महिन्याच्या 5 तारखेस सादर करण्यात यावेत.

सोबत : वरीलप्रमाणे

स्वाक्षरीत-/

कृषि संचालक
विस्तार व प्रशिक्षण
कृषि आयुक्तालय, शिवाजीनगर, पुणे.

**प्रत:- माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.अपर मुख्य सचिव, कृषि व पणन, महाराष्ट्र शासन, कृषि पशंसुवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई -32.

2) मा. मंत्री, कृषि, महाराष्ट्र शासन, मुंबई- 32 यांचे स्वीय सहाय्यक.

3) मा. राज्यमंत्री, कृषि, महाराष्ट्र शासन, मुंबई- 32 यांचे स्वीय सहाय्यक.

**प्रत:- माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव**

4) मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि औद्योगिक विकास महामंडळ, राजन हाऊस, तिसरा मजला, प्रभादेवी, मुंबई- 25.

5) मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, शास्त्रीनगर, अकोला.

6) मा. विभागीय व्यवस्थापक, राष्ट्रीय बीज निगम, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे 37.

7) मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य लघुद्योग विकास महामंडळ, मुंबई.

8) कृषि संचालक (सर्व).

9) मा.संचालक, कापूस विकास निदेशालय, (डी.ओ.सी.डी.) नागपूर यांना माहितीसाठी सादर.

10) संशोधन संचालक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

**प्रत सहपत्रासह माहितीसाठी व कार्यवाहीसाठी रवाना.**

1) कृषि उपसंचालक, आयुक्त कक्ष, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - 1.

2) कृषि माहिती अधिकारी, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-5आवश्यक त्या प्रसिध्दीसाठी.

3) कृषि उपसंचालक (नियोजन), कृषि आयुक्तालय, म.रा., पुणे-5

4) कक्ष अधिकारी (4अे), कृषि व पदुम विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई -32

5) कार्यासन अधिकारी, नि.व.गु.नि.-5, कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे-1

6) कार्यासन अधिकारी, विप्र -12, कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे-5

# राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-व्यापारी पिके अंतर्गत सघन कापूस विकास कार्यक्रम सन 2015-16 मध्ये राबविणेबाबतच्या मार्गदर्शक सूचना (अंतरिम)

सन 2013-14 पर्यत तंत्रज्ञान अभियान -II अंतर्गत राबविण्यात येणारा केंद्र पुरस्कृत सघन कापूस विकास कार्यक्रम 12 व्या पंचवार्षिक योजनेत बंद करण्यात आला असून सन 2014-15 पासून राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-व्यापारी पिके या अंतर्गत कापूस विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आद्यरेषिय प्रात्यक्षिके (देशी आणि अती लांब धाग्याच्या कापूस /अती लांब धाग्याच्या कापसाचे बिजोत्पादन, कापूस पीक आधारित आंतरपीक पध्दती आणि देशी वाणाच्या कापसाची अतीघन लागवड पध्दत) यासाठी केंद्र : राज्य :: 50 : 50 टक्के याप्रमाणे कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

**या कार्यक्रमाची उद्दीष्टे पुढील प्रमाणे आहेत** :-

1. 12 व्या पंचवार्षिक योजनेत अन्नधान्याच्या गरजेसोबतच नगदी पिकांचीही गरज भागविण्यासाठी कापूस पिकांतर्गत अन्नधान्य पिकांचा समावेश करण्यात आलेला आहे.
2. या अंतर्गत कापूस आधारित पीक पध्दतीस चालना देणे.
3. कापूस पिकात मुग, उडीद तुर यासारखा अन्नधान्यांच्या आंतरपिकास प्रोत्साहन देणे.
4. कापूस पिकात एकात्मिक कीड व्यवस्थापन, कापसाच्या देशी वाणांची अतीघन लागवड, अधिक लांब धाग्याच्या कापसाच्या वाणांची प्रात्यक्षिके आयोजित करुन कापूस उत्पादनास चालना देणे.

**योजनेत अंतर्भूत जिल्हे**ही- योजना राज्यातील कापूस उत्पादक विभागामधील खालील 8 जिल्हयांमध्ये राबविण्यात येत आहे.

| अ.क्र. | **विभाग** | जिल्हयाचे नांव |
|---|---|---|
| 1 | अमरावती | 1) बुलढाणा, 2) अकोला, 3) वाशिम, 4) अमरावती, 5) यवतमाळ |
| 2 | नागपूर | 6) वर्धा, 7) नागपूर, 8) चंद्रपूर |

## 1) तालुका निवड -

जिल्ह्याच्या सरासरी उत्पादकतेपेक्षा कमी उत्पादकता असलेल्या तालुक्यांची निवड करावी. तालुक्यातील प्रकल्प क्षेत्र निवडताना त्या तालुक्यातील सर्वात कमी उत्पादकता असणा-या मंडळाची निवड करुन प्रकल्प राबवावा. उत्पादकता वाढीचे लक्षांक ठरविण्यात यावेत व त्याचे नियोजन करण्यात यावे. लक्षांक ठरविताना सर्वात जास्त साध्य झालेल्या उत्पादकते पेक्षा 15 टक्के जास्त लक्ष निर्धारीत करण्यात यावे. जिल्हयांतील सर्व तालुक्यामध्ये हा प्रकल्प राबविणे बंधनकारक नाही. मात्र मागील वर्षी निवडण्यात आलेल्या क्षेत्र व गटांची निवड पुन्हा करण्यात येऊ नये. प्रत्येक वेळी नविन क्षेत्र आणि गटांची निवड करावी.

## 2) प्रकल्प निवड

सन 2015-16 चा कार्यक्रम 10 हेक्टरचा एक या प्रमाणे लघु प्रकल्पाच्या (क्लस्टर) स्वरुपात राबविणे बंधनकारक राहील. त्यानुसार लघु प्रकल्प आराखडा तयार करावा. या प्रकल्पाचे उदीष्ट व त्यावरुन जो परिणाम अपेक्षित आहे यांची नीट मांडणी करुन लघु प्रकल्प तयार करण्यात यावे. निवड केलेल्या क्षेत्राच्या पायाभूत सर्व्हेक्षणाचे (बेसलाईन सर्व्हे) काम पूर्ण करुन सोबत सहपत्रित केलेल्या विहित प्रपत्रात माहिती भरुन प्रकल्पातील उत्पादकतेच्या लक्ष्यांकासह प्रकल्प आराखडा तयार करुन त्यास जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी मान्यता प्रदान करावी. निवड करण्यात आलेल्या प्रकल्प क्षेत्राची निवड इतर कोणत्याही योजनेमध्ये/प्रकल्पामध्ये करु नये. जर प्रकल्प क्षेत्राची एका

पेक्षा जास्त प्रकल्पांमध्ये निवड केल्याचे आढळुन आल्यास प्रकल्पाचा संपूर्ण खर्च वसूल पात्र राहील. तसेच प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर त्यात कितपत यश आले आहे, यांचा प्रगती अहवाल तयार करण्यात यावा. तसेच विविध बाबी राबवितांना पीक वाढीच्या विविध अवस्थेतील फोटोसहीत यशोगाथा तयार करावी.

३) **लाभार्थी निवड -**

3.1) प्रकल्प क्षेत्र व लाभार्थी निवड पंचायतराज संस्थेच्या सक्रिय सहभागाने करावी. त्यासाठी लाभार्थ्याची निवड कृषि सहाय्यकाने करावी. तदनंतर त्यास मंडळ कृषि अधिकारी यांनी तपासुन मान्यता दयावी. मान्य केलेल्या लाभार्थीची यादी ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डवर लावण्यात यावी.

3.2) एका लाभार्थीस किमान मर्यादा 0.40 हेक्टर असून प्रत्येक लाभार्थीस जास्तीत जास्त 0.40 हेक्टरचा लाभ देण्यात यावा.

3.3) जिल्ह्यातील अनुसुचित जाती (किमान 16.50 टक्के)/ अनुसूचित जमाती (किमान 8.50 टक्के) यांच्या लोकसंख्येच्या टक्केवारीच्या प्रमाणात लाभार्थ्यांची निवड करावी. तसेच सर्व प्रवर्गातील लाभार्थीच्या 30 टक्के महिलांची निवड करावी. जिल्ह्यासाठी प्राप्त होणारा आर्थिक कार्यक्रम राबविताना प्रवर्गनिहाय असलेल्या टक्केवारीच्या प्रमाणात कार्यक्रम राबविण्यात यावा.

3.4) प्रात्यक्षिकातील सर्व बाबी राबविण्याची लाभार्थीची तयारी असावी याची जाणीव लाभार्थीला करुन देण्यात यावी.

3.5) निवड केलेला शेतकरी हा " शेतकरी " मासिकाचा वर्गणीदार असणे अनिवार्य आहे.

**प्रकल्प अहवाल तयार करताना खालील बाबींच्या अनुषंगाने मुलभूत सर्वेक्षण करण्यात यावे.**

1) निवडलेल्या क्षेत्रातील पीकनिहाय क्षेत्र, पीक पध्दतीचा तपशील प्रकल्पात दर्शविणे.

2) कापूस पिकाखालील वाणनिहाय क्षेत्र व वाण निहाय उत्पादकतेचे लक्षांक प्रकल्पात दर्शविणे.

3) जमिन आरोग्य पत्रिका नुसार जमीनीचा सामु तसेच उपलब्ध नत्र, स्फुरद, पालाश व सुक्ष्म मुलद्रव्ये यांचा तपशील प्रकल्पात दर्शविणे. राष्ट्रीय जमिन आरोग्य पत्रिका अंतर्गत लाभार्थी शेतकरी निवडताना सदर प्रात्यक्षिके ज्या शेतक-यांच्या शेतावर घेण्यात येणार आहेत त्यांची प्राधान्याने निवड करण्यात यावी.

4) उपलब्ध सिंचन सुविधा त्यातून सिंचनाखालील क्षेत्र व कापूस पिकासाठी उपलब्ध होणारे सिंचन (क्षेत्र) प्रकल्पात दर्शवावे.

5) कापूस पिकासाठी निविष्ठा वापराचे सध्याचे प्रमाण व संपूर्ण प्रकल्पासाठी लागणारे बियाणे, खते, व त्याची उपलब्धता इ. प्रकल्पात दर्शवावी.

6) दि. 21/04/2014 रोजी कृषि आयुक्तालयात झालेल्या बैठकीत कृषि विद्यापीठांच्या शास्त्रज्ञांसमवेत चर्चा करुन या कार्यक्रमांतर्गत द्यावयाच्या अर्थसहाय्याचे हेक्टरी मापदंड निश्चित करण्यात आलेले असून ते सन 2015-16 मध्ये लागु राहतील. त्यामधील बीटी कापूस लागवड आद्यरेषिय प्रात्यक्षिके, देशी वाणांच्या अतिघन पध्दतीच्या लागवडीची आद्यरेषिय प्रात्यक्षिके यांचे प्रति हेक्टरी खर्च प्रमाणके सदरच्या मार्गदर्शक सूचनेत दिली आहेत. त्यानुसार प्रकल्पांतर्गत अर्थसहाय्याचे नियोजन करण्यात यावे.

7) कापूस पिकावर फवारणीसाठी शक्यतो प्रकल्पातील शेतक-यामधून सेवा पुरवठादाराची निवड करावी. त्यासाठी इतर योजनांचा सहभाग घेण्यात यावा. तसे प्रकल्प आराखडयात नमुद करावे.

8) निविष्ठा उपलब्धतेच्या सुविधा तसेच वेचणी झालेल्या कापसाची प्रतवारी नुसार पणन व्यवस्था प्रकल्पात नमुद करावी.

वरीलप्रमाणे सर्व मुदयावर निवडलेल्या प्रकल्प क्षेत्राचे सखोल सर्वेक्षण करून प्रकल्प अहवाल तयार करावा. त्यास जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची मान्यता घेऊन प्रकल्प अंमलबजावणी करावी.

**प्रकल्प अंमलबजावणीची कार्यपध्दती**

1) सर्व प्रकल्प शेतक-यांचे गट करुन कार्यक्रम गटांमार्फत राबविण्यात यावेत.

2) सर्वसाधारणपणे 10 हेक्टरचे गट तयार करुन प्रत्येक 10 हेक्टर मागे एक गट प्रमुख म्हणुन एका प्रगतिशील शेतक-याची निवड करण्यात यावी म्हणजेच एका प्रकल्पामध्ये सर्वसाधारण 10 गट तयार करुन त्याचे प्रत्येकी 1 प्रमाणे 10 गट प्रमुखांची निवड करावी.

3) प्रकल्पामध्ये प्रत्येक गटामध्ये राबवावयाच्या बाबींची माहीती खालील प्रपत्र - 1 ते 2 देण्यात आलेली आहे.

**प्रपत्र - 1**

**जिल्हानिहाय प्रकल्प संख्या**

| अ.क्र | जिल्हा | राष्ट्रीय अन्न सूरक्षा अभियान-व्यापारी पिके अंतर्गत प्रकल्प संख्या |
|---|---|---|
| 1 | बुलढाणा | 66 |
| 2 | अकोला | 42 |
| 3 | वाशिम | 28 |
| 4 | अमरावती | 61 |
| 5 | यवतमाळ | 80 |
| 6 | वर्धा | 32 |
| 7 | नागपूर | 29 |
| 8 | चंद्रपूर | 28 |
| **एकूण** | | **366** |

**प्रपत्र-1अ**

**नगदी (कापुस) पिकावर आधारीत अन्नधान्य पिकांशी निगडीत पिक पध्दती**

| राज्य | पिक पध्दती |
|---|---|
| महाराष्ट्र | सलग कापुस, कापुस – ज्वारी (2 वर्षांचे फेरपालट), मुग, उडीद, सोयाबिन, भुईमुग, आणि तुर पिकाची कापसात आंतरपीक लागवड |

# प्रपत्र-2
## प्रकल्पातील समाविष्ट कार्यक्रम
(एका गटासाठी- क्षेत्र 10 हेक्टर)

(रक्कम रु.लाख)

| अ. क्र. | घटक | परिमाण | अनुदानाचा दर (रु(. | एका गटासाठी (क्षेत्र 10 हेक्टर) चा कार्यक्रम | | एकूण प्रकल्प संख्या | 2015-16 | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | भौतिक | आर्थिक | | भौतिक | आर्थिक | | |
| | | | | | | | | केंद्र | राज्य | एकूण आर्थिक |
| 1 | आद्यरेषिय प्रात्यक्षिके (देशी आणि अती लांब धाग्याच्या कापूस /अती लांब धाग्याच्या कापसाचे बिजोत्पादन( | हेक्टर | रु.8000/- प्रति हेक्टर प्रात्यक्षिक (कृषि विद्यापीठामार्फत राबवायचा कार्यक्रम( | | | | 150 | 6.00 | 6.00 | 12.00 |
| 2 | आद्यरेषिय प्रात्यक्षिके (कापूस पिकात आंतरपिके - मुग, उडीद, तूर( | हेक्टर | रु. 7000/- प्रति हेक्टर (रु. 1000/- प्रति हेक्टर आकस्मिक खर्च समाविष्ट( | 10 | 0.70 | 129 | 1289 | 45.125 | 45.125 | 90.25 |
| 3 | कापसाच्या देशी वाणांची अतीधन लागवड पध्दतीची प्रात्यक्षिके | हेक्टर | रु. 9000/- प्रति हेक्टर (रु. 1000/- प्रति हेक्टर आकस्मिक खर्च समाविष्ट) | 10 | 0.90 | 237 | 2375 | 106.875 | 106.875 | 213.75 |
| | | | | | | | | | | |
| एकुण | | | | | | 366 | 3814 | 158.00 | 158.00 | 316.00 |
| 4 | मागील वर्षाची देय रक्कम | | | | | | | 0.99 | 0.00 | 0.99 |
| सन 2015-16 साठीचा एकूण कार्यक्रम | | | | | | | | 158.99 | 158.0 | 316.99 |

| अ. क्र. | घटक | परिमाण | अनुदानाचा दर (रु(. | एका गटासाठी (क्षेत्र 10 हेक्टर) चा कार्यक्रम | | एकूण प्रकल्प संख्या | 2015-16 | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | भौति | आर्थिक | | भौतिक | **आर्थिक** | | |
| | | | | | | | | | 0 | |

**टीप** : **सन** 2014-15 **मधील** देय रक्कम केंद्र शासनाने उपलब्ध करून दिल्यानंतरच संबंधित जिल्ह्यास सदर रक्कम उपलब्ध करुन दिली जाईल.

4) गटप्रमुखांच्या सहाय्याने राबवावयाच्या कार्यक्रमाचे नियोजन, प्रात्यक्षिकात अवलंब करावयाच्या तंत्रज्ञानाचा तपशील (खर्च प्रमाणकाच्या तक्त्यात दिल्याप्रमाणे) सविस्तरपणे नमुद करण्यात यावा. तसेच त्याचे वेळापत्रकही तयार करण्यात यावे.

5) महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, केंद्रिय कापूस संशोधन संथा, नागपूर, कृषि विद्यापीठ, राष्ट्रीय बीज निगम यांचेकडून बियाणे तसेच महाराष्ट्र कृषि उदयोग विकास महामंडळ यांचे कडून इतर निविष्ठा उपलब्ध करून घ्यावयाच्या आहेत. बियाणे आणि इतर कृषि निविष्ठा वेळेवर उपलब्ध होतील आणि प्रात्यक्षिकांचे आयोजन वेळेवर सुरु होईल याची सर्वस्वी जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची राहील.

6) कार्यक्रम राबविण्यासाठी समाविष्ट घटकाबाबत सर्वसाधारण मार्गदर्शक सूचनानुसार, वाटप करतांना **अनुसूचित जातींना** 16.50 **टक्के**, **अनुसूचित जमातींना** 8.50 **टक्के लाभ देण्यात यावा. महिला लाभार्थ्यांना एकूण लक्ष्यांकाच्या** 30 टक्के याप्रमाणे लाभ देण्यात यावा.

लांब धाग्याचा कापूस लागवडीची प्रात्यक्षिके तसेच देशी वाणाच्या कापसाची अतीघन लागवडीचे प्रात्यक्षिक या दोन्ही प्रकारच्या प्रात्यक्षिकांसाठी प्रति हेक्टर रु. 1000/- याप्रमाणे आकस्मिक खर्चासाठी निधी उपलब्ध आहे. या मधून शास्त्रज्ञांच्या क्षेत्रिय भेटी, शेती दिन, घडीपत्रिकातांत्रिक- साहित्य, सल्ला सेवा, चर्चासत्र, यशोगाथांबाबतचे दृकश्राव्य प्रसार साहित्य इ. साठीचा खर्च भागविण्यात यावा.

1) **आद्यरेषिय प्रात्यक्षिके (देशी आणि अती लांब धाग्याच्या कापूस /अती लांब धाग्याच्या कापसाचे बिजोत्पादन**)

सदर कार्यक्रम कृषि विद्यापीठाच्या मार्फत राबविण्याचे प्रस्तावित असून डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाने प्रस्ताव दिल्यानंतर यासाठीचे रु-/8000. प्रति हेक्टर प्रात्यक्षिक याप्रमाणे 150 हेक्टर क्षेत्राकरीता रु. 12.00 लाख च्या मर्यादेत अनुदान जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अकोला आणि वर्धा यांचेमार्फत कृषि विद्यापीठाकडे वर्ग करण्यात यावेत. या कार्यक्रमांतर्गत उत्पादित बियाणे पुढील वर्षीच्या कार्यक्रमांतर्गत वापरण्यात येईल. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अकोला आणि वर्धा यांनी कृषि विद्यापीठाशी संपर्क साधून कार्यक्रम यशस्वी रितीने राबविला जाईल याकडे पाठपुरावा करावा. ही प्रात्यक्षिके एक हेक्टरची असून त्यासाठी प्रति हेक्टरी खर्च प्रमाणक रु. 8000/- हेक्टर च्या मर्यादेत निश्चित करुन घ्यावीत. कृषि विद्यापिठाअंतर्गत हा कार्यक्रम राबविणे शक्य न झाल्यास तो तालुका बीज गुणन क्षेत्रावर राबवावा. याबाबत बीज प्रमाणीकरण यंत्रणा, महाबीज, अकोला इत्यादी यंत्रणांशी योग्य तो समन्वय साधून बिजोत्पादन कार्यक्रमाची आखणी करुन सदरचा कार्यक्रम कृषि आयुक्तालयास कळविण्यात यावा व त्यानुसार अंमलबजावणी तात्काळ करावी.

कृषि विद्यापीठतालुका/ बीज केंद्रावर किती क्षेत्रावर पायाभूत बियाणे उत्पादनाचा कार्यक्रम राबविला आहे याची माहिती **पेरणी होताच कृषि आयुक्तालयास कळवावे व बीज गुणाकांनुसार उपलब्ध होणाया-पायाभूत बियाणांच्या अंदाजानुसार अनुदानाची मागणी आयुक्तालयाकडे नोंदवावी, त्याप्रमाणे त्यांना अनुदान वर्ग करण्यात येईल. वेळेत मागणी न नोंदविल्यास अनुदानाचा विचार केला जाणार नाही.**

2) **आद्यरेषिय प्रात्यक्षिके (फ्रंटलाईन डेमॉन्स्ट्रेशन्स( (कापूस पिकात आंतरपिके - मुग, उडीद, तूर इत्यादि**

राज्यातील कापूस पिकाखालील एकूण क्षेत्रापैकी बहुतांश क्षेत्र बीटी वाणांच्या लागवडीखाली आहे. कापूस पिकाच्या सुरवातीचा वाढीच्या अवस्थेत संपूर्ण क्षेत्र व्यापले जात नाही. त्यामुळे कापूस पिकात मुग, उडीद यासारख्या कडधान्य पिकांची लागवड केल्यास अधिकचे उत्पन्न मिळु शकते. तसेच कडधान्य पिकामुळे जमिनीचा पोतदेखील सुधारतो. त्यामुळे नॉन बीटी / बीटी वाणांद्वारे लागवड केलेल्या कापूस क्षेत्रात मुग, उडीद, तूर यासारखा कडधान्य पिकांच्या लागवडीची आद्यरेषिय प्रात्यक्षिके आयोजित करावीत. यासाठी रु. 7000/- प्रति हेक्टर याप्रमाणे अर्थसहाय्य देय आहे. याबाबतची खर्च प्रमाणके सोबत सहपत्रित केलेली आहेत.

**राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - व्यापारी पिके अंतर्गत आंतरपिक आधारित आद्यरेषिय पीक प्रात्यक्षिकाचे**

**खर्च प्रमाणक (प्रति हेक्टर)**

पिकाचे नाव - कापूस + मुग / उडीद / तूर आंतरपीक मंजूर दर : रु. 7000/- प्रति हेक्टर

| अ. क्र. | घटक | निविष्ठाचे नाव | मात्रा | रक्कम (रु.) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | बियाणे | नॉन बीटी/ बीटी कापूस बियाणे | 1350 ग्रॅम | 2550 | |
| 2 | बियाणे प्रक्रिया | कॅपटॉन/कार्बान्डेझीम | 5 ग्रॅम/100 ग्रॅम | 50 | |
| 3 | बियाणे (आंतरपिके) | तूर (2.50 किलो/हे.), मुग (2.50 किलो/हे.), (2.50 किलो/हे.), | कृषि विद्या. शिफारशीनुसार | 263 | |
| 4 | जैविक खते | रायझोबियम व पीएसबी | कृषि विद्या. शिफारशीनुसार | 100 | |
| 5 | तन नाशके | पेंन्डीमेथीलीन | 1 लिटर | 400 | 0-5 दिवस पेरणी नंतर |
| 6 | एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन (सुक्ष्म मुलद्रव्य( | झिंक सल्फेट | 25 किलो | 1000 | |
| | | मॅग्नेशियम सल्फेट 50 किलो | 15.80 किलो | 790 | |
| | | फेरस सल्फेट | 5 किलो | 83 | |
| | | बोरॉन | 250 ग्रॅम | 370 | |
| 7 | एकात्मिक कीड व्यवस्थापन | अझार्डिरेक्टीन 1500 पीपीएम, एच ए एनपीव्ही, | कृषि विद्या. शिफारशीनुसार | 500 | |
| | | बीटी इमॅमेक्टिन बेन्झॉएट, क्विनॉलफॉस 25 इसी, डाएमेथोएट 30 इसी | | | |
| 8 | अकस्मीक खर्च | शास्त्रज्ञांच्या भेटी, शेती दिन, वाहन इंधनखर्च इ. | | 1000 | |
| | **एकूण** | | लोक वाटा रु.106/- | **7106** | |

टीप 1. उपरोक्त पॅकेजमधील बियाण्यावर दर्शविलेला खर्च अस्थायी असून महाबीज/सीआयसीआर/राष्ट्रीय बीज निगम इ. यंत्रणांनी निश्चित केलेले दर अंतीम समजण्यात यावेत.

2. प्रति हेक्टरी कमाल देय मर्यादा रु. 7000/- प्रति हेक्टर आहे. याव्यतिरिक्त येणारा खर्च लाभार्थीने करावयाचा आहे.

3. निविष्ठांचे दर अस्थायी स्वरुपाचे असून शासनाने/ कृषि आयुक्तालयाने (निविष्ठा व गुण नियंत्रण) निश्चित केलेले दर अंतीम समजण्यात यावेत.

4. पीक संरक्षण उपचार हे लाक्षणीक (इंडीकेटीव्ह) स्वरुपाचे असून ही औषधे प्लॅट प्रोटेक्शन श्येड्युल (पीक संरक्षण पुस्तिका) आणि सीआयबी तसेच आरसी लेबल क्लेम च्या अधिन राहून वापरण्यात यावीत.
<u>**या प्रात्यक्षिकांतर्गत रासायनिक खतांकरीता कोणत्याही परिस्थितीत अर्थसहाय्य देण्यात येऊ नये.**</u>
5. **सन** 2015-16 **मध्ये सदर अर्थसहाय्य केंद्र : राज्य** :: 50 : 50 **टक्के यानुसार देय असल्याने त्यानुसार खर्च आणि नोंदी होतील याची दक्षता घेण्यात यावी.**

प्रति हेक्टरी देय अर्थसहाय्य रु. 7000/- मध्ये रु. 1000/- इतकी रक्कम शेती दिन, शास्त्रज्ञ भेटी, प्रसिध्दी, छपाई इ. बाबीसाठी उपलब्ध आहेत. त्यातून हा खर्च भागविण्यात यावा. याबाबतचे सविस्तर नियोजन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी कृषि विद्यापीठाशी समन्वय साधून करावे व त्याचा कार्यक्रम निश्चीत करुन क्षेत्रिय अधिका-यांना आयोजनाबाबत सूचना द्याव्यात. उप विभाग व जिल्हास्तरावरुन या शेतीदिन ,शास्त्रज्ञ भेटी इ. कार्यक्रमांचे सनियंत्रण करावे.

सदर प्रात्यक्षिक प्रक्षेत्रावर (0.40 हेक्टर) तसेच आंतरपिक न घेतलेल्या लगतच्या प्रक्षेत्रावरील (कंट्रोल प्लॉट) पिकाच्या वाढीच्या महत्वाच्या अवस्थेतील छायाचित्रे, दोन्ही प्लॉटवर झालेला खर्च आणि त्यापासून मिळणारे उत्पन्न याचा तपशील नोंदवून झालेल्या वाढीव फायद्याबाबत निरिक्षणे नोंदवावीत. सदर प्रात्यक्षिकांतर्गत प्राप्त उत्पादन प्रती हेक्टर च्या स्वरुपात किमान, सरासरी आणि कमाल उत्पादन या स्वरुपात नोंदवून कळविण्यात यावे. तालुका/ जिल्ह्यातील निवडक 3 यशोगाथा कृषि आयुक्तालयास सादर कराव्यात.

सन 2015-16 मध्ये आंतरपिक आधारित आद्यरेषिय पीक प्रात्यक्षिक या बाबीसाठी 1289 हेक्टर (0.40 हेक्टर क्षेत्राची 3223 प्रात्यक्षिके) प्रात्यक्षिक क्षेत्राकरीता एकूण रु.90.25 लाख इतके अर्थसहाय्य मंजूर आहे.

### 3) कापसाच्या देशी वाणांची अतीधन लागवड पध्दतीची प्रात्यक्षिके

राज्यातील पावसाची अनियमितता, पावसातील खंड, बहुतंश हलक्या व उथळ जमिनीतील कापूस लागवड या पार्श्वभूमिवर ब्राझिल तंत्रज्ञानावर आधारित देशी कापसाच्या अतीघन लागवडीची पध्दत अधिक उपयुक्त ठरत आहे. सन 2015-16 मध्ये 2375 हेक्टर क्षेत्रावर प्रत्येकी 0.40 हेक्टरचे एक याप्रमाणे 5938 प्रात्यक्षिके आयोजित करावयाची असून त्यासाठी रु. 213.75 लाख अर्थसहाय्य देय आहे. यासाठीची रु. 9000/- प्रती हेक्टर खर्च प्रमाणके खालील प्रमाणे राहील.

### राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - व्यापारी पिके अंतर्गत कापसाच्या देशी वाणांच्या अतीधन लागवड पध्दतीच्या आद्यरेषिय प्रात्यक्षिकाचे खर्च प्रमाणक (प्रति हेक्टर)

पिकाचे नाव - कापसाच्या देशी वाणाची अतीधन लागवड पध्दत मंजूर दर : रु. 9000/- प्रति हेक्टर

| अ क्र | घटक | निविष्ठाचे नाव | मात्रा | दर | रक्कम रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | बियाणे | देशी वाण | 15 किलो/हे | 120 | 1800 | महाबीजच्या प्रस्तावित दरानुसार(3 किलो पॅकिंग साईज मुळे 5 बॅग्ज धरल्या आहेत) |
| 2 | बियाणे प्रक्रिया | कंपटॉन/कार्बान्डेझीम | 5 ग्राम | 50 | 50 | 100 ग्राम पॅकसाठी |
| 3 | तण नाशके | पेंन्डीमेथीलीन 30इसी | 1 लिटर | 400 | 400 | 0-5 दिवस पेरणी नंतर (मागील वर्षाच्या धर्तीवर) |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 4 | सुक्ष्म मुलद्रव्य | जस्तयुक्त | 25 किलो | 40 | 1000 | 20 अधिक 5किलो पॅकिंग |
| | | मॅग्नेशियम सल्फेट (लिबर्टी) | 50 किलो | 15.80 | 790 | |
| | | फेरस सल्फेट | 5 किलो | 18 | 83 | 5 किलो पॅकिंग |
| | | बोरॉन | 250 ग्राम | 370 | 370 | 1000 ग्राम पॅकसाठी |
| 5 | किटक नाशके | फल्युबेंडीमाइड (फेम) 480एस्सी | 125 मि.ली. | 1120/100 मि.ली. | 1400 | (मागील वर्षाच्या धर्तीवर) |
| | | क्लोरॅन्ट्रॅनिलीप्रोल (कोरॉजीन) | 150 मि.ली. | 1800 | 1800 | |
| 6 | आकस्मीक खर्च | | | | 1000 | |
| | **एकूण** | | | | **8693** | |

<u>टीप</u> :- सन 2015-16 मध्ये कृषि निविष्ठांचे दर निश्चित झाल्यानंतर या मध्ये बदल संभवतो. त्यानंतर घटकांतर्गत दरात अंशत: बदल संभवल्यास त्यानुसार मंजुर रु. 9000/- प्रति हेक्टर अर्थसहाय्याच्या मर्यादेत अर्थसहाय्य देय राहील. प्रति हेक्टरी खर्च मर्यादा रु.9000/- प्रति हेक्टर पेक्षा कमी आल्यास फरकाच्या रक्कमेतून नाविन्यपूर्ण बाबी अंतर्गत विशेष उपक्रम विभागीय कृषि सह संचालक यांचे अधिनस्त समिती स्थापून या समितीने निश्चित केलेल्या बाबींवर करण्यात यावा. त्यानुसार कृषि आयुक्तालयास अवगत करण्यात यावे. अन्यथा कमी रक्कम लागत असल्याने होणा-या बचतीतुन मंजूर तरतुदीच्या आधीन राहुन भौतिक लक्षांक वाढविण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

**<u>या प्रात्यक्षिकांतर्गत रासायनिक खतांकरीता कोणत्याही परिस्थितीत अर्थसहाय्य देण्यात येऊ नये.</u>**

**<u>तसेच या प्रात्यक्षिकांतर्गत बीटी बियाण्यांचा वापर करण्यात येऊ नये.</u> या प्रात्यक्षिकंसाठी लागणारे देशी वाणांचे बियाणे सीआयसीआर, नागपूर, कृषि विद्यापीठ, महाबीज, अकोला, राष्ट्रीय बीज निगम इ. पुरवठादार कंपन्यांकडून घेण्यात यावे, किंवा शेतक-याने स्वत: कडील अथवा खुल्या बाजारातुन देशी वाणाचे बियाणे स्वत:च्या संपूर्ण जबाबदारीवर उपलब्ध करुन घ्यावे. अशा परिस्थितीमध्ये बियाणाची उगवण क्षमता, बियाणाची सत्यता इ. बाबीं बाबत क्षेत्रीय कर्मचारी/अधिकारी यांनी संबंधित शेतक-याकडुन लिखीत स्वरुपात हमीपत्र घेणे अनिवार्य राहील.**

इतर कृषि निविष्ठा महाराष्ट्र राज्य कृषि उद्योग विकास महामंडळ, शासकीय / कृषि विद्यापीठ प्रयोगशाळा इ. मार्फत उपलब्ध करुन घ्यावे. जमिनीची स्वच्छता, चांगल्या बियाणाची निवड, बीज प्रक्रीया, मृद चाचणी अहवालाप्रमाणेच अन्नद्रव्य व्यवस्थापन, कीड रोग सर्वेक्षण प्रकल्पाशी सांगड घालणे, जैविक औषधांचा वापर, जैविक खतांचा वापर, पिकाची निगा चांगली राखणे याविषयी दक्षता घेणे गरजेचे आहे.

सदर प्रात्यक्षिकासोबतच शेतकरी पारंपारिक पध्दतीने करत असलेल्या कापसाच्या लागवड पध्दतीचे (कंट्रोल प्लॉट) संपूर्ण हंगामभर निरिक्षण करुन विशेषत: लागवड खर्च, मिळालेले उत्पादन आणि उत्पन्न याच्या नोंदी ठेवाव्यात. सदर प्रात्यक्षिकांतर्गत प्राप्त उत्पादन प्रती हेक्टर च्या स्वरुपात किमान, सरासरी आणि कमाल उत्पादन या स्वरुपात नोंदवून कळविण्यात यावे. तालुका/ जिल्ह्यातील निवडक 3 यशोगाथा कृषि आयुक्तालयास सादर कराव्यात. त्यानुसार महत्वाच्या टप्यातील पिकाच्या वाढीच्या अवस्थेतील छायाचित्रे काढून पाठवावीत. प्रति हेक्टरी देय अर्थसहाय्य रु. 9000/- मध्ये रु. 1000/- इतकी रक्कम शेती दिन, शास्त्रज्ञ भेटी, प्रसिध्दी, छपाई इ. बाबीसाठी उपलब्ध आहेत. त्यातून हा खर्च भागविण्यात यावा. याबाबतचे सविस्तर

नियोजन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी कृषि विद्यापीठाशी समन्वय साधून करावे व त्याचा कार्यक्रम निश्चीत करुन क्षेत्रिय अधिका-यांना आयोजनाबाबत सूचना द्याव्यात. उप विभाग व जिल्हास्तरावरुन या शेतीदिन, शास्त्रज्ञ भेटी इ. कार्यक्रमांचे सनियंत्रण करावे.

उत्पादकता वाढीचे लक्षांक ठरविण्यात यावेत व त्याचे नियोजन करण्यात यावे. लक्षांक ठरविताना सर्वात जास्त साध्य झालेल्या उत्पादकते पेक्षा 15 टक्के जास्त लक्ष निर्धारीत करण्यात यावे.

**देशी वाणांच्या बियाण्याचे संकलन**

देशी वाणांच्या बियाण्यांची वाढती मागणि लक्षात घेता देशी वाणांच्या अतिघन लागवड पध्दतीची प्रात्यक्षिके ज्या प्रकल्पात राबविण्यात येत आहेत, अशा प्रकल्पात लाभार्थींची निवड झाल्याबरोबर सविस्तर माहिती केंद्र शासनाच्या सोबत सहपत्रित केलेल्या विहित प्रपत्रात परिपूर्ण प्रागतिक माहिती भरुन कॉटन कार्पोरेशन ऑफ इंडीया आणि कृषि आयुक्तालयास वेळोवेळी सादर करावी. सदर अभियानांतर्गत देशी कापसाच्या अतिघन लागवडीच्या आद्यरेषिय प्रात्यक्षिकांमधील उत्पादीत कापसाची खरेदी कॉटन कार्पोरेशन ऑफ इंडिया मार्फत करण्याचे नियोजित असून जिनींग बियाणे संबधित यंत्रणेस उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तसेच बीज प्रमाणीकरण यंत्रणेशी संपर्क साधून बिजोत्पादन कार्यक्रम घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. सदर बियाणांचा आवश्यक त्या कार्यवाहीनंतर बियाणे म्हणून वापर करता येईल. यासाठी विहीत केलेली प्रपत्रे सोबत सहपत्रित केलेली आहेत. याबाबत कॉटन कार्पोरेशन ऑफ इंडीयाच्या विभागीय कार्यालयांशी संपर्क साधून पुढील रुपरेषा निश्चित करण्यात यावी. तसेच विभागीय कृषि सह संचालक यांनी महाबीज, अकोला, बीज प्रमाणीकरण यंत्रणा इत्यादि यंत्रणांसोबत बैठक आयोजित करुन देशी वाणाचे बियाणे प्रापण करण्यासाठीची रुपरेषा निश्चित करावी.

उपरोक्त बाबीचा विचार करुन लघु प्रकल्प आराखडा तयार करावा. सदर कार्यक्रम सन 2015-16 मध्ये राबविताना 10 हेक्टरचा एक या प्रमाणे लघुप्रकल्पामध्ये राबविणे बंधनकारक राहील.त्यानुसार लघु प्रकल्प या प्रकल्पाचे उदीष्ट व त्यावरुन जो परिणाम अपेक्षित आहे यांची नीट मांडणी करुन लघु प्रकल्प तयार करण्यात यावे. प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर त्यात कितपत यश आले आहे, यांचा प्रगती अहवाल तयार करण्यात यावा. तसेच विविध बाबी राबवितांना फोटोसहीत यशोगाथा तयार करण्यात यावी. तसेच कापसाच्या देशी वाणांच्या दाट लागवड प्रात्यक्षिंकांतर्गत एका प्रकल्पात शक्यतो एकाच वाणाची लागवड होईल असे पहावे जेणेकरुन कापूस वेचणी, जिनिंग इ. नंतर प्राप्त होणा-या वियाण्यात सरमिसळ होणार नाही.

केंद्रिय पातळीवर या नविन योजनेची आखणी झालेली असून इतर कार्यक्रम जसे भारत सरकार मार्फत घेण्यात येणारे पीक सर्व्हेक्षण – (On line Pest Monitoring and Advisory Services (OPMAS), एकात्मिक कीड व्यवस्थापन (Integrated Rssistance Management), कृषि विभागाचा पीक सर्व्हेक्षण सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप), अंतर्गत या प्रात्यक्षिक प्लॉटसचा प्राधान्याने सर्व्हेक्षणासाठी आंतर्भाव करावा. याबाबत कापूस संशोधन केंद्र (सीआयसीआर) नागपूर यांचे वेळोवेळी मार्गदर्शन घेण्यात यावे.

**प्रकल्प तयार करतांना खालील बाबीचे पालन करावे.**

कापूस पीकाचे क्षेत्रानुसार तसेच जेथे क्षेत्र वाढीस व उत्पादकता वाढीस वाव आहे याचा विचार करुन तालुकानिहाय/मंडलनिहाय राबवावयाचे लघुप्रकल्पांची संख्या खालील प्रपत्र-1 प्रमाणे निश्चित करावी व संबंधिताना तसे कळविण्यात यावे व प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

**प्रत्यक्ष प्रकल्प अमंलबजावणी**

उपरोक्त बाबींचा विचार करुन प्रकल्प आराखडा तयार करावा. प्रत्येक प्रकल्पामध्ये खालील बाबींचा समावेश करून अंमलबजावणी करावी.

**1) आद्यरेषिय प्रात्यक्षिके (देशी आणि अती लांब धाग्याच्या कापूस /अती लांब धाग्याच्या कापसाचे बिजोत्पादन)**

सदर कार्यक्रम कृषि विद्यापीठाच्या मार्फत राबविण्याचे प्रस्तावित असून डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाने प्रस्ताव दिल्यानंतर यासाठीचे रु.8000/- प्रति हेक्टर प्रात्यक्षिक याप्रमाणे 150 हेक्टर क्षेत्राकरीता रु. 12.00 लाख च्या मर्यादेत अनुदान कृषि विद्यापीठाकडे वर्ग करण्यात येईल. या कार्यक्रमांतर्गत उत्पादित बियाणे पुढील वर्षीच्या कार्यक्रमांतर्गत वापरण्यात येईल. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अकोला आणि वर्धा यांनी कृषि विद्यापीठाशी संपर्क साधून कार्यक्रम यशस्वी रितीने राबविला जाईल याकडे पाठपुरावा करावा.ही प्रात्यक्षिके एक हेक्टरची असून त्यासाठी प्रति हेक्टरी खर्च प्रमाणक निश्चित करुन घ्यावीत. कृषि विद्यापिठाअंतर्गत हा कार्यक्रम राबविणे शक्य न झाल्यास तो तालुका बीज गुणन क्षेत्रावर राबवावा. याबाबत बीजप्रमाणीकरण यंत्रणा महाबीज , अकोला इत्यादी यंत्रणांशी योग्य तो समन्वय साधून बीजोत्पादन कार्यक्रमाची आखणी करुन सदरचा कार्यक्रम कृषि आयुक्तालयास कळविण्यात यावा व त्यानुसार अंमलबजावणी करावी.

योजनेंतर्गत प्रकल्प निवडताना आद्यरेषिय प्रात्यक्षिके (फ्रंटलाईन डेमॉनस्ट्रेशन्स) (कापूस पिकात आंतरपिके – तूर, मुग, उडीद इत्यादि) आणि कापसाच्या देशी वाणांची अतीधन लागवड पध्दतीची प्रात्यक्षिके या दोन्ही घटकांचे प्रकल्प स्वतंत्रपणे राबवावेत. उपरोक्त बाबीचा विचार करुन लघुप्रकल्प आराखडा तयार करावा व क्षेत्र, उत्पादकता वाढीचे लक्ष्यांक ठरविण्यात यावे. तसेच कापसाच्या देशी वाणांच्या दाट लागवड प्रात्यक्षिकांतर्गत एका प्रकल्पात शक्यतो एकाच वाणाची लागवड होईल असे पहावे जेणेकरुन कापूस वेचणी, जिनिंग इ. नंतर प्राप्त होणा-या बियाण्यात सरमिसळ होणार नाही.

**प्रकल्पातील निविष्ठा उपलब्धता:-** केंद्रिय कापूस संशोधन संस्थेच्या मार्गदर्शक सूचनांनूसार देशी वाणांच्या कापसाची दाट लागवड शक्यतो जुन महिन्याच्या सुरवातीसच करावयाची आहे. त्यामुळे आपल्या जिल्ह्यास दिलेल्या लक्ष्यांकाच्या अनुषंगाने वाणनिहाय बियाण्याची मागणी तात्काळ नोंदवून बियाणे प्राप्त करुन लागवड वेळेत पूर्ण होईल याकडे व्यक्तीश: लक्ष द्यावे.

बीटी वाणाचे बियाणे महाबीज, अकोला व कृषि विद्यापीठ यांचेकडून प्राप्त करुन घ्यावे.

दोन्ही प्रकारच्या प्रात्यक्षिकांतर्गत निश्चित करुन देण्यात आलेल्या खर्च प्रमाणकानुसार घटकांचे सखोल नियोजन करुन, लाभार्थीची निवड करुन ठेवल्यास हा कार्यक्रम राबविणे शक्य होईल.

हा कार्यक्रम यशस्वीरित्या राबविण्यात येतो किंवा कसे हे पाहण्यासाठी दरवर्षी राष्ट्रीयस्तरावरील सनियंत्रण समिती राज्यात येते. त्यावेळी या समितीस यशोगाथा दाखविता याव्यात याकरिता खरीप हंगामात हे घटक राबविण्याची पूर्वतयारी आतापासूनच केल्यास या सनियंत्रण समितीस या कार्यक्रमामधून साध्य झालेली कामे दाखविता येऊ शकतील.

पीक प्रात्यक्षिके राबविण्यासाठी खरेदी करावयाच्या सर्व निविष्ठांची मागणी, बियाणे - केंद्रिय कापूस संशोधन संस्था, नागपूर; महाबीज व कृषि विद्यापीठ यांचेकडे तर इतर निविष्ठांची मागणी महाराष्ट्र राज्य कृषिउद्योग विकास महामंडळ या मान्यतप्राप्त पुरवठादार संस्थेकडे नोदविण्यात येवून त्याची एक प्रत आयुक्तालयास सादर करावी. सर्व निविष्ठा वेळेत उपलब्ध करून घेण्याची जबाबदारी संबंधित उपविभागीय कृषि अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व विभागीय कृषि सह संचालक यांची राहील. कोणत्याही परिस्थितीत पुरवठा केलेल्या निविष्ठा पडून राहणार नाहीत याची दक्षता संबंधित विभागीय कृषि सह संचालक यांनी घ्यावी.

विभागीय कृषि सह संचालक यांच्या अध्यक्षतेखालील समितीची मान्यता घेवून निविष्ठा पुरवठा आदेश संचालक (निवगुनि) यांनी निश्चीत केलेल्या पुरवठादार संस्थेकडे मागणी नोदविण्यात यावी. यासाठी निविष्ठा व गुण नियंत्रण मार्फत निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रक (रासायनिक कीटकनाशके), क्र. सीपीएस/रा. कीना. दर/2014-15/80/ गुनि-5/दि. 22 मे 2014, परिपत्रक (जैविक कीटकनाशके), क्र. सीपीएस/जै.कीना. दर/2014-15/82/ गुनि-5/दि. 22 मे 2014 व **तदनंतरच्या परिपत्रकांचा** अवलंब करावा. तसेच **निविष्ठाची निश्चिती करताना निविष्ठा शिफारस केलेल्या मात्रांनुसार घेण्यात याव्यात आणि अनुज्ञेय असलेले अनुदान वजा जाता उर्वरीत रक्कम लोकवाटा म्हणून शेतक-याकडून वसूल करुन संबंधित संस्थेकडे भरणा करावी.**

